बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीच्या अनुषंगाने नगरपरिषदांच्या निवडणुकीमध्ये प्रभाग रचना करण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेले आदेश रद्द करण्याबाबत

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र. रानिआ/नप २०१४/प्र.क्र.१३/का.०६,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०७.०१.२०१५

वाचा :- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/नप २०११/प्र.क्र.५/का.६, दि.६/६/२०११

## आदेश

ज्याअर्थी, सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१८ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० मध्ये सुधारणा करण्यात आली असून त्याद्वारे नगरपरिषदेच्या प्रत्येक प्रभागातून केवळ एकच पालिका सदस्य निवडून देण्यात येईल अशी तरतूद करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, सन २०११ चा अध्यादेश क्रमांक १३ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० मध्ये दुरुस्ती करुन नगरपरिषदांच्या निवडणुकांकरिता बहुसदस्यीय प्रभाग पध्दती लागू करण्यात आली होती. आणि त्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार नगरपरिषद क्षेत्राची प्रभागात विभागणी करण्यासंदर्भात उपरोक्त दि.०६/०६/२०११ च्या आदेशान्वये सूचना निर्गमित केल्या होत्या.

त्याअर्थी, आता याद्वारे राज्य निवडणूक आयोगाने बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीच्या अनुषंगाने नगरपरिषदांच्या निवडणुकीमध्ये प्रभाग रचना करण्यासंदर्भात दि.०६/०६/२०११ रोजी निर्गमित केलेले आदेश रद्द करण्यात येत आहेत. परिणामी यापुढे नगरपरिषदांची एकसदस्यीय पध्दतीनुसार

प्रभाग रचना करण्यासंदर्भात आयोगाने यापूर्वी दिनांक ३ मे, २००५, दिनांक १० जुलै, २००९ व दिनांक ०७/०१/२०१४ रोजीच्या निर्गमित केलेल्या आदेशांमधील सूचनांनुसार नगरपरिषदांची प्रभाग रचना करण्यात यावी.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(ध. मा. कानेड)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई ४०० ०३०
३. सर्व विभागीय आयुक्त
४. जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)
५. मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपंचायती (सर्व)
६. मा.आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
७. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
८. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती